**विशेष दिवाणी दावा क्र.०६/२०२५**
**राहेबा वि. गणपती व इतर**

**नि.क्र. खालील आदेश**

**०१.** प्रतिवादी क्र.६ ने अर्ज देवून नमूद केले की, ते आपल्या वकिलामार्फंत हजर होत असून म्हणणे देण्याकरीता तिला वेळ द्यावा.

**०२.** वादीने दिलेल्या म्हणण्यानूसार प्रतिवादी क्र.६ वर दि.२५/०९/२०२५ रोजी समन्स तामील झाले. तेंव्हापासून ती हजर झालेली नाही. अर्ज मुदतबाहय असल्याने नामंजूर करावा.

**०३.** प्रतिवादी क्र.६ हिच्यावर नि.क्र.१३ प्रमाणे समन्स जारी करण्यात आले होते. सदरचे समन्स तिच्यावर दि.२६/०९/२०२५ रोजी बजावणी करण्यात आले. तेथुन पुढे नेमलेली तारीख दि.०१/०७/२०२५ होती. प्रतिवादी न्यायालयात हजर न झाल्याने सहा. अधिक्षक यांचा अहवाल मागविण्यात आला. त्यांनी प्रतिवादी क्र.६ वर दि.२६/०९/२०२५ रोजी समन्स बजावणी झाल्याचे नमूद केले. त्यामुळे, तेथुन पुढे तिने हजर होणे आवश्यक होते. नि.क्र.४४ नूसार तिच्यावर बजावणी झाल्याची खात्री असल्याने आणि ती हजर न झाल्याने दि.२७/१०/२०२५ रोजी तिच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत होणे आवश्यक होते. मात्र, तसा आदेश आजअखेर पारीत झाला नाही. मात्र, त्यामुळे काही फरक पडत नाही कारण तो आदेश कायद्यानूसार आपोआपच झाल्याचे समजण्यात येते.

**०४.** प्रतिवादी क्र.६ हिने आजरोजी हजर होण्याकरीता वकिलामार्फंत नि.क्र.४६ लगत पुरसीस दिली आहे. मात्र त्यावर तिची सही नाही. तिला हजर होण्यास अवधी हवा असेल मात्र सदर अर्ज हा अद्यापि तिची हजेरी न लागल्याने आणि दि.२६/०९/२०२५ नंतर जवळपास पाच महिन्यांनी दिला असल्याने नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**दिनांक २५/०२/२०२६.** **[एस.एन.सरडे]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.